# संत वंदन

प्रतिभेचा मेरू ज्ञानाचा ईश्वर
बालयोगी मायबोलीचा पामर
स्थापी जो महान भागवत धर्म
त्या ज्ञानोबामाऊलीस हे वंदन

पांडुरंगाने ज्याची चाखली खीर
ज्याने रचिली भक्तीगाथा अभंग
वाहीली विठूची द्वाही दक्षिणोत्तर
त्या संत नामदेवाला हे वंदन

गुरू बृहस्पती आचार्य शुक्र
सुरासुरांचे ते मार्गदर्शक
छत्रपतींचे तसे जे शिक्षक
त्या योगी रामदासा हे वंदन

भक्त शिरोमणी लेखणी रसाळ
नेण्या ज्या विठूने धाडीले विमान
नाचे चोख्यासम जो दिंडीत बेभान
त्या संत तुकोबाला असो वंदन

सावता माळी नि एकनाथ पंडीत
मुक्ता सखु जनी कान्होपात्रेसहीत
संतमालिका आहे चालू अविरत
काल आज उद्याच्या संतांना वंदन

- नारायण
०२/२७/१७